SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004.
P.G. Admission – 0231- 2609142, 2609488, 2609449.
Phone : EPABX – 2609000. Website :
www.unishivaji.ac.in
email : pgadmission@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. – ४१६००४.
पदव्युत्तर प्रवेश विभाग : २६०९१४२, २६०९४८८, २६०९४४९.
फोन : ईपीएबीक्स – 2609000. वेबसाईट :
www.unishivaji.ac.in
ई.मेल : pgadmission@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC (2021) with
CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि./पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य/ 1374

दि. 17/03/2025

**परिपत्रक**

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था

२. मा. अधिविभाग प्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:— सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षातील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' अर्जाबाबत**

**संदर्भ:**—१)या कार्यालयाचे परिपत्रक/पीजी प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य/आरजीडी/१३३९ दि.०३/०१/२०२५

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये पदवी व पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या हुशार, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना एकूण सात प्रकारामध्ये 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्रदान करावयाच्या अनुषंगाने छाननी समितीने छाननी करून संभाव्य पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in/ या संकेतस्थळावरील University Merit Scholarship 2024-2025 या लिंकवर ठेवण्यात आली आहे.

मार्च/एप्रिल २०२४ मधील विद्यापीठाच्या परीक्षेत जे विद्यार्थी ६०% पेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले आहेत व पुढील शिक्षणासाठी आपल्या महाविद्यालय/ अधिविभागामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीकरीता वरील परिपत्रकान्वये ऑनलाईन नामांकन अर्ज भरले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज छाननी समितीने छाननी करून विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालय/ अधिविभागाच्या माहितीकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवलेल्या संभाव्य पात्र (Likely To be Awarded) यादीबाबत काही तक्रारी/सूचना असल्यास विद्यार्थ्यांकडून लेखी स्वरूपात घ्याव्यात व त्या एकत्र करून दि. २१/०३/२०२५ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात पाठवाव्यात. उशीरा पाठविण्यात आलेल्या तक्रारीबाबत विचार केला जाणार नाही.

उपरोक्त शिष्यवृत्तीकरीता ज्या विद्यार्थ्यांनी वरील संदर्भिय परिपत्रकानुसार ऑनलाईन नामांकन अर्ज भरून आपल्या महाविद्यालय/अधिविभागामार्फत विद्यापीठ कार्यालयाकडे विहीत कालावधीत पाठविले नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या तक्रारी/सूचनांचा विचार केला जाणार नाही व उलट टपाली पत्रव्यवहारही केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी

कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

सोबत:— वरीलप्रमाणे

Scanned with OKEN Scanner